# The *Reality of* Sonship

By Michael Shattuck

# पुत्रत्वाची खराई

द्वारा : माईकल शटक

ह्या पुस्तकाला कसे वापरावे:

१. रोज वाचावे.

२. प्रत्येक वेळी ह्याला आपले मन, आत्मा आणि शरिरामध्ये आणि प्रत्येक परिस्थितीमध्ये बोलावे.

३. मननाच्या ह्या रितीचा वापर करावा.

- बसुन किंवा शांत रितीने पडून
- वचनाला मोठयाने बोलून
- अनेकवेळा वचनाला आपल्या मनामध्ये बोलावे.
- पुन्हा करा, पुन्हा करा, पुन्हा करा.
  परिणामाची हमी
  दिग्दर्शित केल्याप्रमाणे वापरल्यासं

# THE REALITY OF SONSHIP

A PERSONAL LIVING WORD
OF THE
NEW CREATION IN CHRIST

# पुत्रत्वाची खंडाई

## ख्रिस्तामधील नवीन सृष्टीचे वैयक्तिक जिवंत वचन

All Scripture reference are from the
king James Version of the Bible

सर्व मराठी वचन ‘‘बाइबल सोसायटी ऑफ इंडीया’’ मधून घेतले गेले आहे. हे पुस्तक संपूर्ण जगात १७ वेगवेगळ्या भाषेत स्थानीय मंडळींनी भाषांतरीत केले आहे. जर आपल्याला कोणत्याही भाषेत हे पुस्तक हवे असेल तर खालील नंबरवर संपर्क साधावा.

**Mob.: 9833099830 / 7718854206**
**Email: denzelpinto / 7718854206**

Michael Shattuck is a co-laborer with the Holy Spirit with a base at Celebration City, Gathering in Portland, Oregon

Printed in India. All Rights Reserved
Published by : New Life Church, Ambarnath

सृष्टीकर्ता परमेश्वर जेव्हा, मनुष्य येशुच्या रुपामध्ये या जगात आला, या जगाने त्याला ओळखले नाही किंवा त्याचा स्वीकार केला गेला नाही, आणि त्यांच्या आपल्या लोकांद्वारे, इस्त्रायल ने सुद्धा त्याला स्वीकारले नाही. परंतु जितक्यांनी त्याला स्वीकारले, जितक्यांनी त्याच्या नावावर विश्वास ठेवला, त्यांना त्याने आपली स्वत:ची मुले होण्याची अनमोल संधी दिली.

हा नवा जन्म, नवीन जीवन कोणाच्या इच्छेने, योग्यतेने किंवा मनुष्याच्या चांगल्या कर्मांनी नाही परंतु परमेश्वराची इच्छा व त्यांच्या जीवनाद्वारे आहे. आम्हांला त्याची पुत्र होण्याचे अनमोल बक्षीस त्यांच्या इच्छेने मिळाले.

**लक्ष द्या :**

येशु तो होता ज्याने आमच्या बदल्यात आणि आमच्यासाठी कार्य केले कि त्याद्वारे आपण त्याच्या बरोबर उच्चस्थानी पोहचू आणि योग्य ठरले जाऊ.

रोमकरांस ५:८

२ करिंथकरांस ५:१४

२ करिंथकरांस ५:१९

**लक्ष द्या :**

येशु निश्चित असा बनला जसे आम्ही आत्म्यामध्ये होतो, परमेश्वराने त्याला त्याच रितीने पाहिले जसे आम्ही अस्तित्वात होतो. तो आमच्यासाठी मरण पावला कारण आपण त्यांच्याबरोबर ओळखले जाऊ शकू.

**२ करिंथकरांस ५:२१**

**यशया ५३ : ९**

**मत्तय २७ : ४६**

**मी ख्रिस्ताबरोबर क्रुसावर खिळलो आहे.**

**गलतीकरांस २:२०**

मी ख्रिस्ताबरोबर क्रुसावर चढलो गेलो आहे. माझा जुना मनुष्य त्यांच्या बरोबर क्रुसावर चढवला गेला आहे. ख्रिस्ताने माझ्या जुन्या मनुष्याला आपल्या बरोबर घेऊन क्रुसावर चढवले आणि मी त्यांच्या बरोबर तिथे मरण पावलो. क्रुस परमेश्वरापासून बनवलेला असा मार्ग आहे कि ज्याद्वारे माझ्यातील जुन्या मनुष्याला दूर केले. मी जोपर्यंत जीवंत आहे तो पर्यंत क्रुसावर चढवलेला आहे. मी परमेश्वराच्या पुत्रावर विश्वास ठेवण्याच्या द्वारे जीवंत आहे. मी दिसण्याद्वारे नाही परंतु विश्वासाने चालतो.

मी परमेश्वराच्या वचनावर विश्वास ठेवतो कि ज्याने म्हटले मी आहे आणि त्याने म्हटले कि तो ख्रिस्तामध्ये माझ्या जवळ आहे.

**गलतीकरांस ६:१४**

मी ख्रिस्ताबरोबर क्रुसावर चढवला गेलो आहे. याशिवाय इतर जागतिक गोष्टींचा गर्व मी करू नये. त्यांच्या क्रुसाद्वारे मी जगासाठी व जग माझ्यासाठी क्रुसावर चढवले गेले आहे. जरीही मी ह्या जगात आाहे परंतु मी ह्या जगाचा नाही, जग माझ्यावर कोणत्याही प्रकारचे वर्चस्व किंवा अधिकार ठेऊ शकत नाही. क्रुसचा पूर्ण अर्थ म्हणजे या जगाची चमक धमक आणि फसवणुकी पासून वेगळे होणे आहे.

मी ख्रिस्ताबरोबर जगासाठी क्रुसावर खिळला गेलो आहे.

**रोमकरांस ६:६**

माझा जुना मनुष्य येशुबरोबर क्रुसावर चढवला गेला आहे. माझा जुना स्वभाव त्याच्या बरोबर क्रुसावर चढवला गेला, आता मी नवीन आहे, नवीन व्यक्ती, नवी

सृष्टी आहे, माझे जुने व्यक्तीत्व त्याच्या बरोबर क्रुसावर खिळल्याने छेदले गेले आहे. माझा पापी स्वभाव माझ्यातून दूर केला गेला आहे. आता मी पापाच्या व्यसनी राहिलो नाही. माझे शरीर आता पापाचे साधन राहिले नाही. माझे शरीर पापासाठी नपुंसक आणि निष्क्रीय झाले आहे. मी आता पापाचा गुलाम राहिलो नाही. पापाची माझ्यावरील जुलुमशाही तुटली आहे. माझा जुना मी, माझा जुना स्वभाव, जुना मनुष्य, ख्रिस्तात त्याच्या बरोबर क्रुसावर खिळला गेला आहे. आता मी ओळखतो आणि जाणतो की माझा जुना स्वभाव, माझे जुणे व्यक्तीत्व ख्रिस्ताबरोबर क्रुसावर चढवले गेले आहे. जुना मी ख्रिस्ताबरोबर क्रुसावर चढवला गेलो आहे.

**मी ख्रिस्ताबरोबर मरण पावलो**

**रोमकरांस ६:८**

माझा जुना मनुष्य त्याच्याबरोबर मरण पावला आहे. मी त्याच्या मृत्युमध्ये सहभागी झालो आहे. त्याचा मृत्यु माझा मृत्यु आहे. माझा जुना स्वभाव त्याच्याबरोबर मरण पावला आहे. मी त्याच्या बरोबर जग, पाप आणि

आजारपणांसाठी मरण पावलो आहे. आता मी त्याच्या जीवनामध्ये सहभागी आहे. मी ख्रिस्ताबरोबर मरण पावलो आहे.

**कलस्सैकरांस २:२०**

मी ख्रिस्ताबरोबर मरण पावलो आहे. जग जसे वस्तुंकडे पाहते, त्याच दृष्टीकोनातून मी त्याच्यासोबत मरण पावलो आहे. मी जगीक तत्वां पासुन स्वत:ला वेगळे केले आहे. आता मी जगाच्या वर्चस्वाखाली राहिलो नाही. मी ख्रिस्ता बरोबर मेलो आहे. मी नियमशास्त्राच्या शापा-पासुन त्याच्याबरोबर मरण पावलो आहे. व्यवस्थेच्या नियमांच्या शापासाठी जे त्याने माझ्यासाठी भोगले त्याद्वारे मी पाप, आजार आणि गरीबीसाठी मरण पावलो आहे.

**कलैस्सै ३:३**

मी मेलो आहे आणि माझे जुने जीवन परमेश्वरा मध्ये ख्रिस्तात लपवले आहे. मी ख्रिस्ताबरोबर जग व जगातील गोष्टीसाठी मेलो आहे. माझ्या जगीक इच्छा येशु बरोबर मरण पावल्या आहेत. माझे खरे जीवन, माझे खरे

व्यक्तीत्व ख्रिस्ता बरोबर परमेश्वरामध्ये लपवले आहे. मी ख्रिस्तात परमेश्वराच्या रहस्यमय जीवनात प्रवेश केला आहे. माझे नविन व्यक्तीत्व या मानवी दृष्टीपासुन ख्रिस्ताच्या ऐक्यामध्ये परमेश्वराच्या अस्तित्वामध्ये झाकलेले आहे.

**रोमकरांस ६:१०,११**

मी त्या सर्व वस्तुसाठी मरण पावलो आहे ज्या वस्तुंसाठी ख्रिस्त येशु मरण पावला. जसा ख्रिस्त मरण पावला आणि एकदाच सर्वांसाठी पापाच्या विस्तारामधुन पुढे गेला, त्याचप्रमाणे मी पण स्वत:ला पापासाठी मेलेला समजतो, मी स्वत:ला पाहतो, विचार करतो, मोजतो कि मी स्वतः पापाच्या सामर्थ्यापासून मरण पावलो आहे.

येशु आजारांसाठी आणि पापांसाठी मेला. आणि ज्याअर्थी मी त्याच्याबरोबर मरण पावलो आहे, त्याचप्रमाणे मी हि आजारांसाठी मेलो आहे. मी हि त्याच्याबरोबर पापाच्या वर्चस्वाला मरण पावलो आहे. मी परमेश्वरासाठी जीवंत आहे. माझ्यात परमेश्वराचे जीवन आहे. माझे जीवन येशुच्या जीवनामध्ये तल्लीन झाले आहे. मी परमेश्वराची

सेवा करण्यासाठी ख्रिस्ताच्या सहभागीते मध्ये पुर्णपणे जीवंत आहे, मी धार्मिकतेसाठी जिवंत आहे. मी शारीरिक स्वास्थ, आरोग्यासाठी जीवंत आहे.

**मी ख्रिस्तासह पुरले गेलो आहे.**

**रोमकरांस ६:४,५**

तो व्यक्ती जो मी होतो तो ख्रिस्ताबरोबर त्याच्या कबरेमध्ये पुरलो गेलो आहे. माझे रोग आणि माझे बंधन त्याच्याबरोबर कबरे मध्ये सीलबंद केले आहेत. जसा तो पित्याच्या तेजस्वी सामर्थाच्या व्दारे मेलेल्यांतुन जिवंत झाला, त्याचप्रमाणे मी सुध्दा त्याच्या आश्चर्यजनक नविन जीवनाचा ताबा घेण्यासाठी पुढे वाटचाल करत आहे. ते जीवन आता माझ्यात आहे आणि ते जीवन आता माझ्यावर नियंत्रण ठेवत आहे. मी जिवंत आहे आणि आता नविन जीवनाच्या क्षेत्रात पुढे जात आहे. त्याचे स्वत:चे पुनरुत्थानाचे जीवन माझ्यामध्ये आहे. त्या जीवनाने ज्याने त्याला नरकावर आणि सैतानावर विजयी होण्यासाठी सक्षम केले तेच जीवन आता माझ्यामध्ये आहे. मी आता त्या पूर्ण गोष्टींसाठी संपुर्णपणे मुक्त आहे ज्या माझ्यासाठी होत्या

व ज्या माझ्यासाठी येशुने सहन केल्या त्यामध्ये पाप, आजार, गरिबी आणि बंधने. मी त्याच्याबरोबरच्या मृत्युने आणि त्याच्याबरोबर पुरले गेल्याने त्याच्यातील एक भाग बनली आहे. आता त्याच्याबरोबर जीवंत झाल्याने मी त्याच्या पुनरुत्थानाच्या जीवनाचा एक भाग बनलो आहे.

**कलस्सेकरांस २:१२**

पाण्याचा बापतिस्मा त्याच्या बरोबर पुरले गेल्याची आणि पुनरुत्थानाची ओळख दर्शवतो. मी त्याच्या बरोबर पुरले गेलो आणि त्याच्याबरोबर पुनः जीवंत झालो. माझा भुतकाळ त्याच्याबरोबर पुरला गेला. माझे अपयश, माझे बंधन त्याच्याबरोबर पुरले गेले आहेत. आता माझ्यामध्ये नवीन पुनरुत्थानाचे विजयी जीवन आहे. मी त्याचे सामर्थ आणि त्याच्या पुनरुत्थानाच्या जीवनाचा भागीदार आहे.

**मी ख्रिस्ता बरोबर जीवंत झालो आहे.**

कलस्सैकरांस २:१३

मी ख्रिस्ता बरोबर जीवंत केलेला आहे. पित्याने आम्हाला एकत्र जिवंत केले आणि त्याच्या उठण्याचे सामर्थ आता माझ्यामध्ये आहे. परमेश्वराने मला त्याच्या नव जीवनाने प्रज्वलित केले आहे ज्याव्दारे येशुला मेलेल्यांतून जिवंत केले. मी त्याच्या जीवनाने पूर्ण भरलेला आहे.

**इफिसकरांस २:५**

खिस्ताला जीवन देण्याव्दारे परमेश्वराने मलाही जीवन दिले आहे कारण मी ख्रिस्ताबरोबर ओळखलो आहे. परमेश्वराने मला मेलेले, पुरलेले, आणि पुनरुत्थीत झालेले पाहिले. मला ख्रिस्ताबरोबर जीवंत केले गेले आहे आणि तेच जीवन आता माझ्यामध्ये श्वास घेत आहे. परमेश्वराने स्वत: मला ख्रिस्ताचे जीवन दिले आहे, हे तेच जीवन आहे कि ज्याव्दारे त्याने येशुला जीवंत केले आणि त्याच जीवनाव्दारे त्याने येशुला नरकाच्या अंधकाराच्या शक्तीवर प्रभुता दिली.

**मी त्याच्याबरोबर विजयी झालो आहे.**

**कलस्सैकरांस २:१५**

त्याचा विजय माझा विजय आहे, कारण मी त्याच्या सारखाच आहे. त्याने माझ्यासाठी सत्ता आणि अधिकाराच्या शक्तींवर विजय मिळवला आहे. त्याने माझ्यासाठी त्यावर विजय मिळवला आहे. त्याचा विजय माझा विजय आहे. मी असे समजतो कि सैतान हारलेला शत्रू आहे. माझ्यावरील सैतानाची सत्ता नष्ट झालेली आहे.

**इब्रीकरांस २:१४**

ख्रिस्ताच्या विजयाद्वारे सैतानाला माझ्यासमोर शक्तीहीन करुन प्रस्तुत केले आहे. त्याला शक्तीहीन केले आहे. तो सैतान हरला आहे, मारला गेला आहे, फेकला गेला आहे. सैतानाला अपाहिज, अपंग, निकामी करून फेकले गेले आहे. मी ख्रिस्तात विजयी आहे. ख्रिस्ताचा विजय माझा विजय आहे. कारण मी त्याच्या बरोबर जीवंत होऊन उठवला गेलो आहे.

**मी ख्रिस्ता बरोबर जिवंत झालो आहे.**

**कलस्सैकरांस ३:१**

मला ख्रिस्ताबरोबर जिवंत केले गेले आहे यासाठी की, मी त्या स्वर्गीय वस्तुचा आनंद घ्यावा ज्याठिकाणी ख्रिस्त पित्याच्या उजव्या बाजुला बसला आहे. स्वांचे अनंतकाळचे खजाने आता माझे झाले आहेत की, मी त्याला घट्ट पकडू शकतो आणि त्यांचा मुक्त आनंद घेऊ शकू. परमेशराच्या सर्व वस्तू आता ख्रिस्तामध्ये माझ्या आहेत. मी ख्रिस्ताबरोबर उठवलो गेलो आहे. मी त्याच्या गौरवमय पुनरुत्थानात सहभागी आहे.

**इफिसकरांस १:१९-२१**

तेच सामर्थ्य ज्याने येशुला मेलेल्यांतुन उठवले ते माझ्यात कार्य करीत आहे. त्याचे पुनरुत्थानाचे सामर्थ्य हे महान, असिमीत, अपरिमीत, अमर्यादीत, प्रतिरोधक, विस्मयकारक आणि प्रचंड पराक्रमी आहे. त्याचे पुनरुत्थानाचे सामर्थ्य माझ्यामध्ये कार्य करीत आहे, कारण मी ख्रिस्ताबरोबर मरणांतून उठवला गेलो आहे. मी त्याच्या पुनरुत्थानाचे फायदे घेत आहे. मी ख्रिस्तासह उठवला गेलो आहे.

## मी ख्रिस्ताबरोबर बसवलो आहे
## इफिसकरांस १:१९–२१, २६, लूक १०१९

मी ख्रिस्ताबरोबर मरणांतून उठवलो गेलो आहे व तेच पराक्रमी सामर्थ्य ज्या सामर्थ्याने येशुने साऱ्या मानवजातीच्या शत्रूवर विजय मिळवला त्याच सामर्थ्याने मला सुध्दा उंच केले आहे. मी त्याच्या बरोबर बसवलो आहे. मी त्याच्या स्वर्गाच्या सिंहासनाच्या क्षेत्रामध्ये सहभागी आहे. मी त्याच्याबरोबर पाप, गरीबी, आजार, सैतान आणि साऱ्या परिस्थितीवर अधिकार ठेवत आहे. जे काही येशुच्या पायाखाली आहे ते माझ्या पायाखाली देखील आहे, कारण मी त्याच्या बरोबर बसवला गेलो आहे. सर्व प्रधानता, शक्ती आणि अंधकाराचा प्रभाव माझ्या पाया खाली आहे. आजार आणि गरिबी माझ्या पायाखाली आहेत. सैतान माझ्या पायाखाली आहे. मला साना आणि विंचवांना पायाखाली तुडवण्याचा अधिकार आहे. मला शत्रूकडे असलेल्या सर्व सामर्थ्यावर अधिकार दिला गेला आहे.

**अनंतकाळचे जीवन**

येशुच्या येण्याचे कारण हे पापमूक्त करण्याच्या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**योहान ६:३३,१०:१०,१ योहान १:१,२,४९ :**

येशुमध्ये जीवन प्रगट झाले. तो जीवनदाता आहे. पित्याने पुत्राला मला जीवन देण्यासाठी पाठवले, येशु स्वर्गातून खाली आला यासाठी कि मला जीवन दयावे, असे जीवन कि जे ईश्वरासारखे जीवन आणि अनंतकाळचे जीवन, माझ्यामध्ये हे जीवन आहे.

**रोमकरांस ५:१८–२१**

आदामाचे पाप जगात आत्मिक मुत्यूला घेऊन आले. परंतु येशुच्या धर्मिकतेने अनंतकाळीन जीवनाचे दार उघडले आहे. ख्रिस्तामध्ये परमेश्वराचा मुख्य उददेश मला धार्मिक बनवने आणि मला जीवन देणे होते. ख्रिस्ताच्या सुटकेच्या कार्याने मला मुक्त केले आहे आणि मला जीवन दिले. मला परमेश्वराबरोबर योग्य ठरवले गेले. आणि अनंतकाळाचे जीवन मला दिले गेले आहे. येशु ख्रिस्तामध्ये परमेश्वराचे अनंतकाळाचे जीवन आता माझ्यामध्ये आहे.

योहान ३:१४-१६,६:५१,१थेस्सलनीकरांस५:१०

मला जीवन देण्यासाठी येशुने आपले रक्त सांडले आणि आपला प्राण दिला. त्याने माझ्या पापाची शिक्षा भोगली आहे. मी आता धार्मिक बनलो आहे. आणि माझ्यात जीवन आहे. पित्याने मला स्वर्गातून जीवन पाठवले आहे. आता ते जीवन माझ्यामध्ये आहे. आता माझ्या आत्म्यामध्ये ईश्वरीय आणि स्वर्गीय जीवन आहे.

**अनंतकाळचे जीवन हे परमेश्वराचे जीवन आहे आणि हा परमेश्वराचा स्वभाव आहे.**

**योहान १:४,५:२६**

परमेश्वर आत्मा आहे. त्याच्या आत जीवन आहे, ते आत्मिक जीवन आणि अनंतकाळचे जीवन आहे. येशुकडे सुध्दा त्याच प्रकारचे जीवन होते. मी आत्मा आहे. मला ही त्याच प्रकारचे जीवन मिळाले आहे. मी परमेश्वरापासून जन्मलो आहे आणि आता परमेश्वराचे जीवन माझ्या मध्ये आहे. माझ्यामध्ये सुध्दा त्याच प्रकारचे जीवन आहे जे ''मी आहे'' मध्ये अनंतकाळापासून अस्तित्वात आहे.

**इफिसकरांस ४:१७–१८, २ पेत्र १:४**

अनंतकाळचे जीवन परमेश्वराचे जीवन आहे आणि तो एक ईश्वरीय स्वभाव आहे. माझ्यामध्ये परमेश्वराचे जीवन आणि परमेश्वराचा स्वभाव आहे. मी त्या दैवीय स्वभावाचा सहभागी आहे. मी हया जगात पापामूळे असणाऱ्या आत्मिक मृत्युतून वाचवला गेलो आहे. माझ्यामध्ये परमेश्वराचा स्वभाव आहे. मी त्याच्या स्वभावामध्ये सहभागी होण्यासाठी आलो आहे कारण माझ्यामध्ये त्याचे जीवन आहे.

**माझ्यामध्ये अनंतकाळचे जीवन आहे**

**योहान ३:३–६**

वास्तवात माझा आत्माच माझे खरे व्यक्तित्व आहे जो माझ्या शरिरामध्ये वस्ती करीत आहे. येशु ने आत्म्याला एक मनुष्य म्हणून संबोधले आहे. मी आत्मा आहे. आणि येशुच्या व्दारे मी वरुन नव्याने जन्मलो आहे. परमेश्वराचे वरील जीवन मला दिले आहे. मी वरुन जन्मलो आहे, परमेश्वराव्दारे माझा जन्म झाला आहे. तेच परमेश्वराचे जीवन व स्वभाव माझ्यामध्ये आले आहे. मी आता पित्याच्या परीवारामध्ये आहे.

इब्रीलोकांस १२:९

जे जीवन पित्यामध्ये आहे ते पित्याने मला दिले आहे. माझ्यामध्ये पित्याचे जीवन आहे. मला अनंत पिता दिला गेला आहे. परमेश्वर माझा पिता आहे. तो स्वत:चा पिता आहे आणि मी त्याचा पुत्र आहे. त्याचा माझा स्वभाव माझ्यामध्ये आहे.

**१ पेत्र १:२३**

परमेश्वराने त्याच्या वचनाव्दारे दिलेल्या जीवनाव्दारे माझे पुनरुज्जीवन आणि माझा नविन जन्म झाला आहे. त्याच्या जीवनाने भरपूर होउन, परमेश्वराच्या वचनाव्दारे त्याच्या जीवनाने माझ्यात त्याचे जीवन जमा केले आहे. मी परमेश्वराच्या वचनाव्दारे परमेश्वराचा लेपालक संतान आहे. त्यामध्ये जीवन आहे. माझ्यामध्ये जीवन आणि तोच परमेश्वराचा स्वभाव आहे. परमेश्वराच्या अविनाशी जीवनाच्या वचनाव्दारे मी पुर्नजीवीत आणि नव्याने जन्मलो आहे. मी आता परमेश्वराचा पुत्र आहे. परमेश्वराने मला त्याचे स्वत:चे अविनाशी अनुवंशीक दिले आहे. मला नवीन जन्म जिवंत परमेश्वराच्या अविनाशी वचनान्दारा मिळाला आहे.

**इफिसकरांस २:१, योहान ५:२४**

मी पाप आणि अपराधांमध्ये मेलेला होतो, मृत्यु ने मला जखडले होते परंतु परमेश्वराने मला जीवंत केले आहे. मी मृत्यु मधून निघून जीवनात प्रवेश केला आहे. आता अनंतकाळाचे जीवन माझ्या ताब्यात आहे. मी अनंतकाळीन जीवनाचा आनंद घेत आहे. मी मृत्युची सीमा पार करुन जीवनामध्ये प्रवेश केला आहे. मी मृत्युतून जीवनाच्या प्रदेशात परावर्तित झालो आहे.

**रोमकरांस ८:२, १०**

मी जीवनाने भरलेलो आहे. मी जीवनाचा आनंद घेत आहे. परमेश्वराचे जीवन, स्वर्गाचे जीवन, येशु ख्रिस्ताचे जीवन आता माझ्यामध्ये आहे. त्या जीवनाने मला पाप आणि मृत्यु पासून मुक्त केले आहे. जूना स्वभाव मला सोडून गेला आहे. आता नवीन स्वभाव माझ्यात आलेला आहे. आणि मी मुक्त झालो आहे. येशु ख्रिस्ताने जून्या व्यवस्थेला, जून्या सिध्दांताला, जून्या दशेला, पापाच्या जून्या स्वभावाला आणि मृत्युला माझ्यातून विस्थापित केले आहे. आता परमेश्वराची धार्मिकता, परमेश्वराचे जीवन मला प्रदान केले

गेले आहे. परमेश्वराचे जीवन माझ्यामध्ये वास घेत आहे आणि आता मी एक नविन व्यक्ती बनलो आहे.

**अनंतकाळचे जीवन कशा प्रकारे दिले गेले**
**२ तिमथ्यी १:१०, इब्रीलोकांस २:९**

आपल्या स्वत:च्या आत्म्यामध्ये माझ्यासाठी त्या मृत्युला चाखून माझ्या जून्या स्वभावाला आणि आत्मीक मुत्युला समाप्त केले. त्याने माझ्या जून्या स्वभावाला नष्ट केले आहे. आता त्याचे जीवन माझ्यामध्ये आहे. मी मरणातून निघून जीवनात प्रवेश केला आहे.

**प्रेषितांचे कृत्ये २:२४, २७, २८**

येशु आत्म्यामध्ये माझ्याजागी मरण पावला. तो आत्म्यामध्ये पुनः जिवंत झाला, जेंव्हा त्याने माझ्या पापासाठी योग्य किंमत दिली. माझा जुना स्वभाव, आत्मिक मृत्यु माझ्यातून पुसून टाकले आणि ख्रिस्तामध्ये मला जीवन दिले. ख्रिस्त येशुमध्ये परमेश्वराने मला जीवन दिले. येशुने माझा मृत्यु घेउन आणि माझ्या पापाची शिक्षा भोगून जीवनाला जिंकले, हे जीवन आता माझ्यामध्ये आहे.

१ पेत्र ३:१८, कलैस्सेकरांस १:१८ प्रकटिकरण १:५ १ प्रेषितांची कृत्ये १३ : ३२–३४

येशु शारिरीक दृष्ट्या जीवंत होण्या अगोदर आत्म्यामध्ये जीवंत झाला. परमेश्वराने आपल्या आत्म्यामध्ये त्याला जीवन संपन्न केले. येशु हा पहिला होता जो पुनरुत्थीत झाला त्याने माझ्यासाठी मृत्युची चव घेतली, तो माझ्यासाठी पुनः जिवंत झाला. त्याने कार्य केले आणि तो माझ्यासाठी उभा राहिला. त्याने माझे प्रतिनिधित्व केले. परमेश्वराने जेंव्हा हे जीवन त्याच्या पुत्रामध्ये दिले तेंव्हाच ते अनंतकाळचे जीवन मलाही प्रदान केले. हे असे होते जसे मला पुन: जीवंत केले. त्याने माझ्या जून्या स्वभावाला आणि माझ्या आत्मिक मृत्युला सहन केले. न्यायाच्या दाव्यांच्या समाधानासाठी त्याने माझ्या पापांच्या शिक्षेचे दु:ख भोगले. जेणेकरुन मी धार्मिक बनू शकेन, त्याने माझ्यासाठी जीवन प्राप्त करुन दिले आणि तेच जीवन जे त्याला दिले ते आता माझ्यांत वस्ती करत आहे.

**कलैस्से २:१५, प्रकटिकरण १:१८, रोमकरांस ८:३७–३९**

तेच जीवन ज्याने येशुला नरकावर आणि दृष्ट आत्म्यांवर विजय मिळवून दिला तेच जीवन आता माझ्यामध्ये आहे. मी त्याच्या पुर्नजीवीत, विजयी जीवनाचा सहभागी आहे.

मी मन वळवण्याच्या स्थायिक प्रक्रिये द्वारे या निष्कर्षापर्यंत पोहचू शकलो कि काहिही मला हरवू शकत नाही. माझी पूर्णपणे खात्री पटली आहे की कोणतीहि खोली, उंची, सैतान किंवा, परिस्थिती माझ्यावर विजय मिळवू शकत नाही, मी विजयाहून ही अधिक मोठा आहे. मी प्रचंड विजयी झालो आहे. मी सतत विजय संपादन केले आहे कारण ज्या जीवनाव्दारे येशुने नरकावर विजय मिळवला तेच जीवन माझ्यामध्ये आहे. त्याच्याव्दारे प्रचंड विजय माझा आहे आणि त्याचे जीवन माझ्यामध्ये आहे.

**इफिसकरांस २:५, कलस्सैकरांस २:१३**

परमेश्वराने येशुला आणि मला एकत्रित जीवंत केले आहे. माझी ओळख त्याच्या प्रज्वल्लित होण्याव्दारे आणि महान विजयाव्दारे आहे. मी त्याच्या बरोबर विजयी

झालो, जेंव्हा त्याने सैतानाला त्याच्या अधिकारापासुन निकामी केले. मी त्याच जिवनाने भरपूर आहे ज्याने येशुला नरकावर प्रभूत्व दिले. परमेश्वराने जे जीवन ख्रिस्तामध्ये दिले तेच नवजीवन माझ्यामध्ये श्वास घेत आहे. मी त्या नव जीवनापासून फार सुखी आहे. मी ख्रिस्ताबरोबर त्याच्या नवीन जीवनाचा भागी आहे ज्याने त्याला मृत्युतून जीवंत केले.

**रोमकरांसपत्र.६:४**

मी ख्रिस्ताबरोबर गाडला गेलो आणि त्याच रितीने जसे ख्रिस्ताला पित्याच्या गौरवाव्दारे उठवले गेले, आता मी त्याच्या जीवनाच्या अधिकारात आहे. मी जगतो, हालचाल करतो आणि माझ्यातील हया नविन स्वभावाव्दारे, नविन जीवनाव्दारे माझ्या वर्तणूकीला शिस्त लावतो. ख्रिस्ताचे पुनरुत्थित जीवन आता माझ्यामध्ये आहे. त्याचे विस्मयकारक नविन जीवन मला आनंद देण्यासाठी दिले गेले आहे. माझ्याकडे शुध्द जीवन आहे. ते जीवन माझ्यावर आतून वर्चस्व करत आहे.

**रोमकरांस ६:५**

मी ख्रिस्ताबरोबर त्याच्या पुनरुत्थानात पक झाली आहे. माझ्याकडे त्याच्या सारखेच पुनस्थित जीवन आहे, मी त्याचा बरोबर मरण पावल्याने त्याचा एक भाग झाली आहे. मी त्याच्या मृत्युमध्ये आणि पुनरुत्थानामध्ये सहभागी होण्याने त्याच्याबरोबरच्या एकाच स्वभावाचा भागी आहे, त्याच्या पुनरुत्थानाने नविन जीवनाला मुक्त केले गेले आहे आणि ते जीवन माझ्यामध्ये निवास करत आहे. मी त्याच्या पुनरुत्थित जीवनाच्या बागेत एका रोपा सारखा बनवला गेलो आहे ज्यामूळे मी भरपूरीने फळदायी झालो आहे.

**रोमकरांस पत्र ६८**

मी आणि माझा जूना आत्मिक स्वभाव ख्रिस्ताबरोबर मरण पावला आहे. आणि आता मी येशुच्या नव्या जीवनात सहभागी आहे. जेंव्हा तो आत्म्यामध्ये जीवंत केला गेला तेंव्हा मी माझ्या नवजीवनात जीवंत झालो आहे. मी ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या जीवनात सहभागी झालो आहे. ते जीवन ज्याने नरकावर प्रभुत्व दाखवले ते आता माझे आहे.

**रोमकरांस ६:१०–११**

ख्रिस्ताबरोबर मरण पावल्याने, मी पाप, आजार, सैतानावर विजय मिळवला आहे. येशु ज्यासाठी मरण पावला त्या सर्वांसाठी मीही मृत्यु पावलो आहे आणि येशु ज्यासाठी जीवंत आहे त्या सर्वांसाठी मी सुध्दा जीवंत आहे. माझ्यात त्याचे जीवन आहे. जो काही परमेश्वर आहे आणि जे काही त्याचे आहे त्या सर्वांसाठी मी जीवंत आहे. माझे जीवन ख्रिस्ताच्या जीवनामध्ये तल्लीन झालेले आहे. ख्रिस्ताच्या जीवंत झालेल्या जीवनाव्दारे त्याने पाप, आजारपण, सैतान आणि मृत्युवर विजय मिळवला आहे. तेच जीवन माझ्यामध्ये आहे.

**अनंतकाळचे जीवन माझी आत्मिक भुक भागवते.**
**योहान ४:१४**

माझ्यातून अनंतकाळच्या जीवनाचा झरा उसळी घेत आहे. हया झऱ्यातून मला अनंतकाळाच्या जीवनाचे पाणी मिळत आहे. स्वर्गाचे जीवन माझ्यातून उसळत आहे आणि मला ताजेतवाणे करत आहे. माझ्या सत्यतेच्या तहानेला भागवत आहे. माझ्यातील उत्कट इच्छेचे समाधान

करत आहे कारण हे परमेशराचे स्वत:चे जीवन आहे. जे काहि परमेश्वरामध्ये आहे ते त्याच्या जीवनामध्ये आहे. परमेश्वर स्वतः मला तृप्त करत आहे. माझा आतील भाग भरलेला आणि परमेश्वराच्या जीवनाने भरुन वाहत आहे.

**यूहन्ना ६:३५**

येशु माझा प्रभु जीवनाची भाकर आहे, माझ्याकडे तो आहे, माझ्याकडे जीवन आहे. ते जीवन माझ्या आत्मिक भुकेला तृप्त करते. हे मला रोमांचीत करते आणि हे माझ्या आत्मिक खालिपनाला भरते. माझ्याकडे स्वर्गातून, स्वर्गीय आशिर्वाद, स्वर्गीय आनंद आणि स्वर्गीय सुख आणणारे सतत पुरवठा करणारे जीवन वाहत आहे. हे मला स्वतःपरमेश्वरामध्ये पूर्ण व्याप्त करते.

**योहान ७:३८**

जीवनाचा झरा माझ्यातून बाहत आहे. माझ्या आतून तो वाहत आहे, जीवनाच्या पाण्याचा लोंढा माझ्या आतून, माझ्या हदयातून जलद गतीने वाहत आहे. आणि माझ्या सर्व मनुष्यत्वला जीवन देत आहे आणि माझ्या

आजुबाजूच्या सर्वांना प्रभावीत करीत आहे माझ्या उदरातून जीवनाच्या पाण्याचा झरा वाहत आहे.

**प्रकटिकरण २१:६,२२:१,१७**

मी जीवनाच्या पाण्याला आपल्या भरपूरीतून मुफ्तपणे मध्ये पिऊ शकतो. मी त्या पाण्याला माझ्यामध्ये पीत आहे जे स्वर्गीय सिंहासना पासून येत आहे. हे पाणी निर्मल, स्वच्छ आणि स्फटिका प्रमाणे उज्वल आहे, हे जीवन माझ्यामध्ये ओतले जात आहे आणि हे स्वर्गातून माझ्याजवळ आणले जात आहे. हे जीवन मला उर्जा देते. माझ्यात स्वर्गीय जीवन वाहत आहे आणि हे जीवन माझ्यात स्वर्गीय आशिर्वाद, आनंद आणि स्वर्गीय करार घेऊन येते. मी त्या जीवनाच्या भरपूरीने समाधानी आहे जे माझ्या आत वाहत आहे. मी स्वर्गीय आशिर्वादांचा स्रोत आहे.

**अनंतकाळच्या जीवनाला स्वीकारल्याने मी सैतानाच्या सत्तेतून मुक्त झालो आहे.**

**१ योहान ३:१४,१५, इबीलोकांस २:१४**

मला माहित आहे की मी मुत्युतून जीवनात आलो

आहे. मी मृत्युमधून जीवनात बदली झालो आहे. मी मृत्युतून निघुन जीवनात प्रवेश केला आहे. आणि मी सैतानाच्या सत्तेतून निघालो आहे. तो मृत्युच्या क्षेत्रात राज्य करतो. मी मृत्युतून जीवनात गेलो आहे म्हणून मी त्याच्या अधिकारातून बाहेर निघालो आहे. सैतानाला माझ्या जीवनामध्ये शक्तीहीन प्रस्तुत केले आहे. आता तो शून्य आहे आणि त्याचे सामर्थ लुटले आहे. अनंतकाळचे जीवन स्वीकारल्याने मी सैतानाच्या अधिकारातून मुक्त झालो आहे.

**प्रेषितांची कृत्ये २६:१८**

येशु जीवनाचा प्रभु आहे आणि तो त्या सर्वांचा प्रभू आहे जितक्यांनी अनंतकाळचे जीवन मिळवले आहे. मी मृत्युतून जीवनात पार झालो आहे. मी त्या क्षेत्रातून जिथे सैतान प्रभु आहे तेथून निघून जिथे यीशु प्रभु आहे त्या क्षेत्रात आलो आहे. मी रुपांतरित झालो आहे. मला मृत्युपासून जीवनात भाषांतरीत केले गेले आहे. मी सैतानाच्या सत्तेतून मुक्त झालो आहे. आत्मीक मृत्युने मला सैतानाच्या सत्तेत ठेवले होते. अनंतकाळच्या जीवनाने मला यातून मुक्त केले आहे. मी मृत्युचे क्षेत्र सोडले आहे आणि जिथे येशु प्रभु आहे त्या जीवनाच्या क्षेत्रात हस्तांतरित झालो आहे.

**कलस्सै १:१३,१४**
मी अंधकाराच्या बंधनातून वाचवला गेलो आहे आणि परमेश्वराच्या पुत्राच्या राज्यामध्ये सहभागी झालो आहे. मी सैतानाच्या राज्यातून निघालो आहे. मी पुत्राच्या क्षेत्रात स्थापित केला गेला आहे. मी अंधकाराच्या आत्मिक शक्तीच्या वर्चस्वातून मुक्त झालो आहे. जेव्हा मी अनंतकाळचे जीवन स्वीकारले तेंव्हा सैतानाच्या अधिकारातून निघून परमेश्वर पुत्राच्या नव्या जगात सामील झालो आहे, त्यात मला पापमुक्ती आणि सुटका आहे.

ती खंडणी जी माझ्या मुक्ततेसाठी आहे ती आता माझ्या मालकिची आहे आणि ती खंडणी मला बंधनातून मुक्त करते. मी सैतानाच्या गुलामीतून त्याचरितीने स्वतंत्र झालो ज्यारितीने इस्त्रायली लाल समुद्राला पार करताच फारोच्या गुलामीतून स्वतंत्र झाले. सैतानाने माझ्यावरील, माझ्या मनावरील, माझ्या शरिरावरील, माझ्या पैशावरील, आपली सत्ता गमावली आहे.

**रोमकरांस ५:१७**

मी ख्रिस्ताच्या नव्या जीवनात राजा आहे. मी जीवनाच्या क्षेत्रात राजाप्रमाणे राज्य करतो. आत्मिक मृत्युने मला सैतानाजवळ पोहचवले होते परंतु अनंतकाळच्या जीवनाने मला त्याच्या अधिकार क्षेत्रातून मोकळे केले आहे. अनंतकाळचे जीवन मला उत्कृष्ठ बनवते. ते मला राजा बनवते. मी सैतानावर राज्य करतो आहे. मी आजारावर राज्य करतो, मी पापावर, गरिबीवर आणि परिस्थितीवर राज्य करतो आहे. मी जीवनामध्ये येशु ख्रिस्ताव्दारे विजयोत्सवाने राज्य करतो आहे.

**अनंतकाळचे जीवन मला येशुच्या ऐक्यामध्ये जोडते.**
**१ योहान ५:११-१३**

परमेश्वराने मला अनंतकाळचे जीवन दिले आहे. आणि ते मला दिले गेले आहे. हे जीवन जे माझ्यामध्ये आहे तेच पुत्रामध्येसुध्दा अस्तित्वात आहे. माझ्यामध्ये जीवन आहे. मी मानतो, मला खात्री आहे आणि मला जाणीव आहे कि माझ्या आतमध्ये अनंतकाळचे जीवन आहे. परमेश्वराने मला जीवन दिले आहे, ते जीवन जे पुत्रामध्ये राहते.

माझ्याकडे तेच जीवन आहे. मी अनंतकाळच्या जीवनाचा मालक आहे.

**योहान ६:५३–५७**

मी त्याचे शरीर खाल्ले आहे, मी त्याचे रक्त प्यायले आहे. तो माझ्यासाठी मरण पावला. आता माझ्यामध्ये जीवन आहे. माझ्याकडे अनंतकाळाचे जीवन आहे. मी माझ्यामध्ये त्याचा आनंद उपभोगत आहे. मी त्याचे शरिर खाल्ले आहे आणि त्याचे रक्त प्याले आहे. मी त्याच्या आणि तो माझ्या ऐक्यामध्ये आहे. अनंतकाळच्या जीवनाने मला त्याच्या एकतेत ठेवले आहे. त्याचप्रकारचे जीवन जे त्याच्यामध्ये आहे तेच जीवन आता माझ्यामध्ये आहे. ते जीवन आम्हाला एक करते. जसे येशुने पित्यातील एकतेव्दारे जीवनाला काढले त्याचप्रमाणे मी ख्रिस्तातून जीवनाला काढत आहे. मी त्याच्याबरोबर एकतेमध्ये आहे.

**योहान १४:१९–२०**

त्याच्याकडे जीवन असल्याने माझ्याकडे ही जीवन आहे. त्याच्या स्वत:मध्ये जीवन आहे. माझ्यामध्ये हि

तेच जीवन आहे. येशु आणि माझ्यामध्ये एक सारखेच जीवन आहे. मला माहित आहे कि मी त्याच्याबरोबर एकत्रित आहे, आम्ही एक आहोत. लो एक आत्मा आहे आणि त्याच्यामध्ये जीवन आहे. मी सुध्दा एक आत्मा आहे आणि माझ्यामध्ये सुध्दा जीवन आहे. मी त्याच्याबरोबर एकतेमध्ये आहे आणि तो सुध्दा माझ्या एकतेमध्ये आहे.

**योहान १५:४–५**

माझ्याकडे स्वत: येशूचे जीवन आहे, मी आणि येशू त्या जीवनाचे सहभागी आहोत. मी त्याच्याबरोबर एकतेमध्ये आहे. जसे फाटा वेलाच्या एकतेमध्ये असतो त्याचरितीने मी परमेश्वर पुत्राच्या जिवंत सहभगितेमध्ये आलो आहे. तो वेल आहे आणि मी फाटा.ज्यारितीने वेलावे जीवन फाटयामध्ये वाहत असते त्याचप्रमाणे त्याचे जीवन, परमेश्वराचे जीवन, एक दैवीय स्वभाव माझ्यामध्ये आणि माझ्याव्दारे वाहत आहे. मला माझे जीवन त्याच्याव्दारे मिळते. मी जीवनाचा भागी आहे. ते जीवन मला फलदायी बनवते. ख्रिस्ताला माझ्यामध्ये वाढवण्याचे हे एक कारण आहे. ख्रिस्त माझ्यामध्ये वाढत आहे. येशु आणि मी एकत्र

वाढलो. जे काही वेलामध्ये आहे ते फाट्यात देखील आहे. जे काही त्याच्यात आहे ते माझ्यामध्ये सुध्दा वाहत आहे.

त्याचे जे काही आहे त्याने त्याचे जीवन पूर्ण भरलेले आहे. जे काही त्याच्यात आहे ते माझ्या मध्ये देखील आहे. जे काही वेलामध्ये समाविष्ठ आहे त्या प्रत्येक वस्तूंनी मी भरलेला आहे. ख्रिस्त माझ्यामध्ये आहे. मी परमेश्वराच्या पुर्णत्वतेच्या एकतेमध्ये आहे. ज्याच्यामध्ये बुध्दी आणि ज्ञान आहे, मी त्याच्या एकतेमध्ये आहे. मी निर्माणकर्त्याच्या आणि ह्या विश्वाला स्थिर ठेवणाच्या एकते मध्ये आहे. मी त्याच्या एकते मध्ये आहे जो या जगातील सामर्थ्यावर आणि आकाशांतील दृष्ट आत्म्यांवर सर्वोच्च आहे. मी ख्रिस्ताच्या एकतेमध्ये आहे.

**परमेश्वराच्या जीवनाने माझ्या बुध्दीला वाढवले तसेच माझ्या व्यक्तित्वाला वाढवले आहे.**

**योहन १:४,८:१२**

परमेश्वराचे जीवन मला प्रकाश देते, हे जीवन माझ्यात माझ्या बुध्दीला वाढवते. माझ्या मनात माझ्या आत्म्यातुन प्रकाश वाहत आहे. आणि प्रकाश अंधकाराच्या ज्ञानाने बांधलेला नाही. माझे मन आत्म्याद्वारे चालवले जात आहे. माझ्या मनावर आत्म्याचे प्रभुत्व आहे. परमेश्वराचे जीवन माझ्या मनाला प्रकाशित करत आहे. मी अंधकारात चालत नाही, माझे मन आणि व्यक्तीत्व परमेश्वराच्या जीवनाद्वारे जे माझ्यात आहे, दासत्वातून सोडवले गेले आहे ते जीवन, ख्रिस्ताचे जीवन माझ्या प्राणाला ख्रिस्ताची सर्व परिपूर्णता आणि व्यक्तीत्वाने भरत आहे. ख्रिस्ताची सम्पूर्णता आणि व्यक्तीत्व माझ्यात बनत आहे. त्याचे जीवन माझ्यात आहे. परमेश्वराची समज माझ्यामध्ये अधिकाराला मिळवत आहे. येशु प्रभुचे व्यक्तीत्व अंधकारामध्ये चालत नाही कारण प्रभू येशुचे व्यक्तीत्व माझ्यात बनत आहे. आणि मी अंधकारात चालत नाही कारण प्रभु यीशुचे जीवन माझ्यात कार्य करत आहे.

माझ्यात असलेले परमेश्वराचे जीवन पाप, आजार आणि सैतानाला दूर करते.

**१ योहान ३:९**

माझ्याकडे परमेश्वराचा स्वभाव आहे. ते दैवीय जीवन माझ्यात आहे आणि माझ्यावर नियंत्रण ठेवत आहे. माझ्यामध्ये माझ्या पित्याचा स्वभाव आणि त्याची आनुवंशिकता आहे. ते जीवन माझ्यात पापावर विजय मिळवते. मी पाप करत नाही आणि मी पापाच्या व्यवस्थेच्या वर्चस्वातुन मुक्त झालो आहे, कारण परमेश्वराचे जीवन माझ्यात आहे आणि माझ्यावर नियंत्रण करीत आहे.

**१ योहान ५:४**

मी परमेश्वरापासून जन्मलो आहे आणि परमेश्वराचे जीवन माझ्यात आहे. मी जगावर विजयी झालो आहे. मी जगावार मात करतो. मी विजेता पेक्षा ही अधिकतेसाठी जन्मलो आहे. माझ्यामध्ये असलेले परमेश्वराचे जीवन सर्वदा माझ्या बाहेरील जगावर विजय मिळवते. मी जगांतील वस्तू ज्या पाप, आजार आणि सैतान आहेत त्यांवर विजयी झालो आहे. मी जगांवर सतत विजय

मिळवला आहे कारण मी परमेश्वराच्या माझ्यामधील जीवनाव्दारे परमेश्वरापासून जन्मलो आहे.

**१ योहान ५:१८**

मला परमेश्वरापासून नवीन जीवन मिळाले आहे. माझा जन्म पित्यापासून झाला आहे. परमेश्वराच्या पुत्राचे दैवीय जीवन माझे रक्षण करीत आहे. सैतान माझा ताबा घेऊ शकत नाही. सैतान मला बांधू शकत नाही. परमेश्वराचे जीवन माझ्यातून पाप, आजार आणि सैतानाला दूर ठेवत आहे. हे जीवन माझ्यातून उत्सर्जीत होत आहे आणि मला महिमाने वेष्टीत करत आहे. हे माझ्यातून सैतानाला आणि आजाराला चुंबकिय बल क्षेत्रासारखे दूर ठेवते, परमेश्वराचे जीवन माझ्यातून उत्सर्जीत होउन माझ्यातून पाप, आजार आणि सैतानाला दूर ठेवते.

**रोमकरांस ८:११**

परमेश्वराचा आत्मा माझ्यात त्याचे घर करत आहे. तो परमेश्वराचे जीवन घेतो आणि माझ्या संपुर्ण स्वभावात आणि शरिरात प्रसारित करतो. परमेश्वराचे

जीवन माझ्यातून माझ्या शरीरात वाहून शरीराला ताजेतवाने करतो आणि शरिराला रोगांपासून मुक्त ठेवतो. परमेश्वराचे जीवन हे बरे करणारे जीवन आहे आणि परमेश्वर यहोवा राफा जो दैवीय वैदय आहे. प्रभुचे जीवन जे बरे करणारे आहे ते माझ्या शरीरातून रोगांना मारून आणि काढून कार्य करीत आहे. परमेश्वराचे जीवन रोगांना माझ्या शरीरातून विस्तापीत करत आहे. परमेश्वराचा आत्मा माझ्यातून माझ्या प्राणात आणि माझ्या शरीरात परमेश्वराचे जीवन पुरवठा करित आहे. तो माझ्या संपूर्ण जीवनात शक्ती आणि चेतना आणत आहे. परमेश्वराचा आत्मा, माझ्यातून वाहून मला आणि माझ्या भौतिक शरीराला नवजीवनाने भरत आहे.

**रोमकरांस ५:१०**

मी तारला गेलो आहे, बरा केला गेलो आहे, सांभाळला गेलो आहे, सोडवला गेलो आहे आणि माझ्यात ख्रिस्ताच्या जीवनाने माझ्यामध्ये निवास केला आहे. ते जीवन मला पापाच्या प्रभुत्वापासून, आजाराच्या प्रभुत्वापासून आणि सैतानाच्या प्रभुत्वापासून मुक्त करते. परमेश्वराचे जीवन माझ्यातून पाप, आजार आणि सैतानाला

दूर करत आहे. मी त्याच्या जीवनाव्दारे जे माझ्यात आहे तारण पावलो आहे. त्याच्या पुनरुत्थीत जीवनाने जे माझ्यामध्ये आहे त्याव्दारे मी प्रतिदिनी पापापासुन आणि आजारांच्या सत्तेपासुन मुक्त केला जात आहे.

अनंतकाळचे जीवन माझ्यामध्ये वाढत आणि विकसित होत आहे.

**योहान ६:३३,६८**

त्याचे वचन माझ्यात अधिकाधिक जीवन देत आहे. त्याचे शब्द जीवनाने परिपूर्ण आहेत. त्याचे शब्द माझ्यात प्रवेश करुन जीवन प्रदान करत आहे. तो शब्द आता माझ्यात आहे आणि त्याव्दारे मी जीवनाने भरत आहे.

**इब्री लोकांस ४:१२**

परमेश्वराचा शब्द सामर्थ्याने जिवंत आहे. तो जीवंत, सक्रिय सामर्थ आणि उर्जेने भरलेला आहे. तो जीवनाने आणि सामर्थ्याने भरलेला आहे. परमेश्वराचा शब्द परमेश्वराच्या जीवनाने भरलेला आहे. परमेश्वराचा शब्द माझ्यात परमेश्वराच्या जीवनाला अधिकाधिक रितीने ठेवत

आहे. परमेश्वराचे जीवन माझ्यात विकसित होत आहे. परमेश्वराचा शब्द माझ्यात छेदत आहे, माझ्यात प्रवेश करत आहे आणि मला जीवनाने भरत आहे. तो माझ्या अस्तित्वाच्या अति आतील भागात झिरपत आहे आणि मला जीवनाने आणि सामर्थ्याने भरत आहे.

**गलतिकरांस ६:८**

जसे मी परमेश्वराचे वचन माझ्यात पेरत आहे, तेच माझ्यात अधिकाधिक रितीने परमेश्वराचे जीवनाची कापणी करणारे आहे. परमेश्वराच्या वचनात परमेश्वराचे जीवन आणि उर्जा आहे. मी त्या जीवनाने आणि उर्जेने भरलेला आहे. ते माझ्यात नेहमी वाढणाऱ्या मापाने धडधडत आहे. परमेश्वराचे वचन माझ्या अस्तित्वाच्या अति आतील भागात झिरपत आहे आणि जीवनाने विस्फोटित होत आहे. परमेश्वराचे जीवन माझ्यातून उत्सर्जीत होत आहे.

**योहान १०:१०**

माझ्यामध्ये अनंतकाळचे जीवन आहे. माझ्याकडे हे भरपूरीने आहे, हे जीवन माझ्यात उसळत

आहे. परमेश्वराच्या जीवनाला अधिकाधिक ग्रहण करण्यासाठी मी माझ्या जीवनाच्या क्षमतेला वाढवत आहे. माझ्यामध्ये जीवन उसळत आहे, माझ्यामध्ये असीमीत जीवन आहे. माझ्याकडे ते जीवन आहे जे भरपूरीने वाढत जाते. हे जीवन माझ्यामध्ये एका पूराप्रमाणे वाढत आहे. हे मला गीळंकृत करत आहे, माझ्या मनाला आणि शरिराला व्यापून पुनःस्थापीत करत आहे आणि माझ्या प्राणाला सामर्थ देत आहे. स्वर्गाचे जीवन माझ्यात आणि माझ्यातून नदि प्रमाणे वाहत आहे. एक जीवनाची नदि आहे जी परमेश्वरा सारखी आहे जी माझ्यातून वाहत आहे. चमत्कारीक जीवन, वाचवलेले जीवन, स्वर्गाचे जीवन माझ्यामध्ये आहे. हे माझ्यामध्ये आत्मा आणि वचनाव्दारे नेहमी प्रमाणे विकसित होउन वाढत आहे.

आपल्या पिता परमेश्वराने अनाकलनिय प्रेमाचा गुणधर्म अशा रितीने दिलेला आहे कि आम्हाला त्याने ‘‘पुत्र’’ म्हणून मानले आहे. आम्ही जगाव्दारे परमेश्वराचे ‘‘पुत्र’’ म्हणून ओळखले गेलो नाही कारण जग परमेश्वराला ओळखत नाही.

आम्ही खरच, आत्ता, ताबडतोब, परमेश्वराचे पुत्र आहोत. हे आता आम्हाला स्पष्ट नाही कि येशु पुनः आल्यावर आम्ही कसे असु परंतु आम्हाला एक खात्री आहे कि तो जेंव्हा येईल तेंव्हा आम्ही त्याच्या सारखे असू. कारण आम्ही त्याला जसा तो आहे तसे पाहणार आहोत.

हि सारी आशा आमच्यामध्ये जीवंत आहे. ह्यामुळे आम्ही पवित्र आत्म्याला अनुमति देते कि त्याने आम्हाला शुध्द करावे जसा येशु परिशुध्द आहे. आम्ही आमची दृष्टी त्याचवर ठेवतो.

१ योहान ३:१-२
होय, पिता, जे तुम्ही माझ्याबद्दल बोलले आहे त्याबद्दल मी सहमत आहे.
मी कोण आहे, मी काय आहे, आणि मी काय करू शकतो. तुझ्यामध्ये.

## पुत्रत्वाचे वचनातील संदर्भ

मत्तय ५:९
योहान १:१२
रोमकरांस ८:१४-१७
रोमकरांस ८:१९
रोमकरांस ९:२६
गलतीकरांस ३:२६
गलतीकरांस ४:५-७
इफिसकरांस १:५
फिलीपकरांस २:१५
इब्री लोकांस २:१०
१ योहान ३:१,२
प्रकटीकरण २१:७

## शहरामध्ये एकत्रित होण्याचा उत्सव

ह्या एकत्रिततेचा उद्देश परमेश्वराच्या देहाची सहायता करणे हा आहे. ह्याचा परिणाम परमेश्वराच्या पुत्राचे ज्ञान आणि त्याचा प्रकाश वाढवणे हा आहे.

Email : denzelpintogmail.com
Mob.: 9833099830 / 7718854206